**भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील महिलांच्या नोंदणीकृत सहकारी संस्थांमधील महिला सदस्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत ठाणबंद पध्दतीने शेळीपालन करण्यासाठी १० शेळ्या + १ बोकड अशा शेळी गटाचे वाटप करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः पविआ-१०१९/प्र.क्र.१८२/पदुम-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ११ सप्टेंबर, २०१९

**प्रस्तावना :-**

राज्यातील भटक्या जमाती - क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी विविध योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. धनगर व तत्सम समाजातील मेंढपाळ विविध ठिकाणी भटकंती करुन, शेळ्या-मेंढ्यांचे पालन पोषण करुन, उदर निर्वाह करतात. अशा स्वरुपाच्या भटकंतीमुळे त्यांना अनेक समास्यांना तोंड द्यावे लागते. जसे, भटकंतीवर जाताना ते सर्व कुटूंबिय समवेत जातात, त्यामुळे त्यांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधा मिळत नाहीत. परिणामी, या समाजामध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. आरोग्य सुविधेअभावी महिला व बालकांच्या प्रकृतीस्वास्थ्यांची हानी होते. नैसर्गिक आपत्ती शिवाय इतर कारणास्तव त्यांच्याकडील पशुधनाचा मृत्यू झाल्यास त्यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळत नाही. परिणामी, सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती आणखी खालावत आहे.

२. या समाजाच्या सतत भटकंतीमुळे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर रहावे लागत असल्यामुळे, त्यांना आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीपासून वंचित रहावे लागत आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता, भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजास मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवीन योजना सुरू करण्याची आवश्यकता आहे.

३. कोणत्याही कुटूंबाचा उदरनिर्वाह योग्य व सुरळीत चालविण्यासाठी त्या कुटूंबातील महिलेची प्रमुख भुमिका असते. कुटूंबातील अनेक जबाबदाऱ्या महिलेस पार पाडाव्या लागतात. तसेच, कुटूंबातील महिलेच्या कुवतीप्रमाणे कुटूंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्या आर्थिक मदत करत असतात. धनगर व तत्सम समाजातील महिला शेळी / मेंढी पालन या पारंपारिक व्यवसायामध्ये मदत करतात. त्यामुळे त्यांची कुटुंबासोबत भटकंती सुरू असते. धनगर व तत्सम समाजातील महिलांना पर्यायाने धनगर कुटूंबांना स्थैर्य प्राप्त होण्याची दृष्टीने धनगर व तत्सम समाजातील नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेंच्या सदस्यांना ठाणबंद पध्दतीने शेळीपालन करण्यासाठी १० शेळ्या + १ बोकड अशा शेळी गट वाटप करण्याची नवीन योजना सुरू

करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**४. शासन निर्णय:-**

राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेच्या सदस्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत ठाणबंद पध्दतीने शेळीपालन करण्यासाठी प्रत्येक महिला सदस्यास १० शेळ्या + १ बोकड अशा शेळी गट वाटपाची योजना सुरू करण्यासाठी खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

(१) राज्यस्तरीय योजनेंतर्गत राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ जिल्ह्यात राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेच्या सदस्यांसाठी सन २०१९-२० या वित्तीय वर्षापासून योजना राबविण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

(२) या योजनेंतर्गत ठाणबंद पध्दतीने शेळीपालन करण्यासाठी १० शेळ्या + १ बोकड असा शेळी गट १२५ नोंदणीकृत महिला सहकारी संस्थांना प्रथम टप्प्यात वाटप करण्यासाठी ७५ टक्के शासनाचा हिस्सा (अनुदान) व २५ टक्के लाभार्थ्यांचा हिस्सा या तत्वावर राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(३) सदर योजनेसाठी ७५ टक्के अनुदानानुसार येणारा एकूण आर्थिक भार रु. २४७५.०० लक्ष एवढ्या निधीस तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

**५. योजनेचा उद्देश:-**

(१) राज्यातील भटकंती करणाऱ्या धनगर व तत्सम समाजातील पशुपालकांना पारंपारिक पद्धतीने करीत असलेल्या शेळीपालन या व्यवसायापासून त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करून देणे तसेच धनगर व तत्सम समाजातील महिलांना पर्यायाने धनगर कुटूंबांना स्थैर्य प्राप्त होण्याची दृष्टीने, तसेच त्या समाजातील महिलांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणे.

(२) राज्यामध्ये बंदिस्त शेळीपालन व्यवसायास चालना देणे.

(३) शेळीपालनाचा पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या समाजातील महिलांना स्वयं-रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.

(४) राज्यामधील शेळ्यांच्या संख्येमध्ये वाढ करून, राज्याच्या कृषि व संलग्न क्षेत्रातील स्थूल उत्पन्न वाढीच्या दराचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करणे.

(५) स्थायी स्वरुपाच्या ठाणबंद पध्दतीने शेळीपालन करण्यासाठी महिला पशुपालकांना आकर्षित करुन त्यांना स्थैर्य निर्माण करुन देणे.

**६. योजनेचे स्वरूप:-**

(१) सदर योजना राज्य शासनाने अधिसूचीत केलेल्या भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेच्या सदस्यांसाठी लागू राहील.

(२) नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेमध्ये भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातींमधील किमान २० व कमाल ३० महिला सभासद राहतील.

अथवा

(३) नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेच्या एकूण सदस्यांपैकी किमान ९० टक्के महिला सदस्य (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातींमधील असतील व उर्वरीत १० टक्के इतर कोणत्याही मागास प्रवर्गातील असतील.

(४) या योजनेमध्ये सन २०१९ -२० या आर्थिक वर्षापासून ठाणबंद पध्दतीने शेळीपालन करण्यासाठी संस्थेतील प्रत्येक लाभार्थी महिला सदस्यांस १० शेळ्या + १ बोकड असा शेळी गट पायाभूत सुविधेसह १२५ नोंदणीकृत महिला सहकारी संस्थांना वाटप करणे.

(५) नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेमध्ये किमान २० आणि कमाल ३० महिला सभासदांचा समावेश असेल.

(६) एका नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेमध्ये कमाल ३० महिला सदस्य गृहीत धरुन, १२५ संस्थांमधील ३७५० लाभार्थी महिला सदस्यांना शेळी गटाचे वाटप करणे.

(७) सदर योजनेमध्ये ७५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा राहील व २५ टक्के हिश्याची रक्कम लाभार्थ्यांने स्वत: किंवा बँकेकडून कर्ज घेऊन ( किमान ५ टक्के स्वहिस्सा व उर्वरीत २० टक्के बँकेचे कर्ज) उभारणे आवश्यक आहे.

(८) सदर योजनेमध्ये स्वहिस्साची रक्कम भरण्याची क्षमता असलेल्या महिला सदस्य लाभार्थ्यांचीच निवड करण्यात येईल. या अनुषंगाने महिला लाभार्थ्यांनी स्वहिस्साची रक्कम भरण्याची हमी देणे आवश्यक राहील. लाभार्थी स्वहिस्सा भरण्याकरिता बॅकेकडून कर्ज घेणार असल्यास, सदर महिला लाभार्थ्याने या योजनेंतर्गत निवड झाल्यानंतर बॅकेकडून स्वबळावर कर्ज उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील. अशी हमी संबंधित महिला सदस्याने देणे आवश्यक राहील.

(९) सदर योजनेमध्ये लाभार्थी म्हणून निवड झालेल्या नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेमधील सर्व महिला सदस्यांनी स्वहिश्श्याची रक्कम भरल्याशिवाय, सदर संस्थेतील सदस्यांना शेळी गटाचे वाटप करण्यात येणार नाही.

(१०) उस्मानाबाद / संगमनेरी जातीच्या १० शेळ्या + १ बोकड या शेळी गटाची एकूण किंमत रु.८७,८५७/- एवढी राहील. त्यापैकी ७५% हिस्सा म्हणजेच रु. ६५,८९३/- एवढे शासनाचे

अनुदान अनुज्ञेय असेल. उर्वरित २५% हिस्सा म्हणजे रु. २१,९६४/- एवढी रक्कम स्वहिस्सा म्हणून लाभधारकाने भरणे आवश्यक आहे.

(११) या राज्यस्तरीय योजनेंतर्गत १० शेळ्या + १ बोकड या शेळी गटांचा बाबनिहाय खर्चाचा तपशील सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे.

(१२) ज्या महिला लाभार्थीना मागील ५ वर्षामध्ये पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेचा (दुधाळ जनावरे गट वाटप, शेळी गट वाटप, कुक्कुट गट संगोपनासाठी पायाभूत सुविधांच्या निर्मितीकरिता अर्थसहाय्य, एकदिवशीय कुक्कुट पिलांचे वाटप, तलंगाचे गट वाटप इ.) लाभ दिलेला आहे. असे लाभार्थी या योजनेमध्ये निवडीस पात्र ठरणार नाहीत.

(१३) शेळी गटाच्या खरेदीनंतर वाहतूकीचा सर्व खर्च लाभार्थी संस्थेने करणे आवश्यक आहे.

(१४) सदर योजनेमध्ये निवड झालेल्या लाभार्थी संस्थेमधील सर्व सदस्यांनी वैयक्तीकरित्या राष्ट्रीयकृत बँक / शेडयुल्ड बँक / सहकारी बँकेमध्ये खाते उघडणे आवश्यक राहील, जेणेकरुन या खात्यामध्ये अनुदानाची रक्कम डीबीटी द्वारे वर्ग करणे शक्य होईल.

(१५) तसेच लाभार्थी संस्थेमधील सर्व सदस्यांनी त्यांचा आधार क्रमांक व पॅन क्रमांक (आवश्यक असेल त्याठिकाणी) या खात्याशी संलग्न करणे बंधनकारक राहील.

(१६) या योजनेअंतर्गत उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या पैदासक्षम शेळया / बोकडांची खरेदी प्राधान्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, मर्या., पुणे यांचेकडून करण्यात येईल. महामंडळाकडे शेळया / बोकड उपलब्ध नसल्याचे प्रमाणपत्र महामंडळाने दिल्यास, अशा वेळी शेळ्या / बोकडांची खरेदी अधिकृत बाजारातून करण्यात येईल.

**८. शेळी गट खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-**

(i) संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार)

(ii) संबधित पशुधन विकास अधिकारी / स.प.वि.अ. / प.प. निकटतम पशवैद्यकीय दवाखाना

(iii) संबधित बँकेचा प्रतिनिधी (लाभार्थ्यांच्या स्वहिस्सा कर्जरुपी असल्यास),

(iv) विमा कंपनीचा प्रतिनिधी, (v) लाभार्थी.

**९. शेळी गटाचा विमा:-**

(१) शेळयांची खरेदी केल्यानंतर लाभार्थ्याने त्यांचा विमा लगेच उतरवून घेणे बंधनकारक राहील.

(२) शेळी गटाचा विमा लाभार्थी आणि जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (पदनामाने) यांच्या संयुक्त नावे उतरविण्यात यावा.

(३) गटातील विमा संरक्षीत शेळया/बोकडाचा मृत्यू झाल्यास, प्राप्त होणा-या विम्याच्या रकमेतून लाभार्थ्यांने पुन्हा शेळया किंवा बोकड खरेदी करणे आवश्यक राहील.

(४) लाभार्थ्याने विहित नमुन्यात बंधपत्र करुन देणे आवश्यक राहील. योजनेअंतर्गत मंजूर अनुदानापेक्षा प्रत्यक्ष अंमलबजावणीस जास्त खर्च येत असल्यास, आवश्यक ती अतिरिक्त रक्कम लाभार्थीने स्वत: भरणे आवश्यक आहे.

(५) शेळी गटाचा पुरवठा केल्यानंतर लाभार्थ्यांने कमीत कमी ३ वर्षे ठाणबंद पध्दतीने शेळी पालन व्यवसाय करण्याचे हमी पत्र देणे आवश्यक आहे.

(६) लाभार्थ्यांने शेळया विकल्याचे किंवा अन्य प्रकारे योजनेच्या अंमलबजावणीमध्ये चूक केल्याचे दिसून आल्यास, अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत विहीत महसूल कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

**१०. लाभार्थी निवडीची कार्यपध्दती:-**

(१) भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातींमधील नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेंच्या महीला लाभार्थींचे या योजनेचा लाभ घेण्यासाठी, संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे अर्ज मागविण्यात येतील.

(२) संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छानणी करुन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाकडे पाठविण्यात येतील.

(३) महामंडळ प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करुन, सर्व प्रस्ताव शिफारशीसह पदुम या विभागाकडे सादर करेल.

(४) पदुम विभाग प्राप्त झालेले पात्र अर्ज, अंतीम मान्यतेसाठी विजाभज, इमाव व विमाप्र या विभागाकडे शिफारशीसह सादर करेल.

(५) विजाभज, इमाव व विमाप्र या विभागाकडे प्राप्त झालेल्या अर्जामधून सदर योजनेमध्ये पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या निवड करुन, त्याप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना योजनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे लाभ देण्यास मान्यता देईल.

(६) सदर योजनेंतर्गत विजाभज, इमाव व विमाप्र विभागाने निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांना योजनेतील लाभ देण्यासंदर्भात या विभागाकडून महामंडळास निर्देश देण्यात येतील.

(७) सदर निर्देशप्रमाणे महामंडळाकडून योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल.

**११. जिल्हास्तरीय छाननी समितीची संरचना:-**

| | |
|---|---|
| (i) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त - | अध्यक्ष |
| (ii) जिल्हा समाज कल्याण अधिकारी / प्रतिनिधी - | सदस्य |
| (iii) महिला व बालकल्याण अधिकारी / प्रतिनिधी - | सदस्य |
| (iv) जिल्हा रोजगार स्वयंरोजगार अधिकारी / प्रतिनिधी - | सदस्य |
| (v) सहाय्यक आयुक्त, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय - | सदस्य सचिव |

**१२. कार्यन्वयन यंत्रणा:-**

राज्य क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या योजनेची अंमलबजावणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लि., पुणे यांचेद्वारे करण्यात येईल.

**१३. लाभधारक निवडीचे निकष-**

(१) सदर योजना राज्य शासनाने अधिसूचीत केलेल्या भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील नोंदणीकृत महिला सहकारी संस्थेच्या सदस्यांसाठी लागू राहील.

(२) लाभधारकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

(३) लाभधारकाची निवड करताना अपंगाकरिता ३% आरक्षण ठेवण्यात यावे.

(४) ज्या महिला लाभार्थींना मागील ५ वर्षांमध्ये पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेचा (दुधाळ जनावरे गट वाटप, शेळी गट वाटप, कुक्कुट गट संगोपनासाठी पायाभूत सुविधांच्या निर्मितीकरिता अर्थसहाय्य, एकदिवशीय कुक्कुट पिलांचे वाटप, तलंगाचे गट वाटप इ.) लाभ दिलेला आहे, असे लाभार्थी या योजनेमध्ये निवडीस पात्र ठरणार नाहीत.

(५) एका कुटुंबातील एकाच महिला लाभार्थीस या योजनेचा लाभ देण्यात येईल.

१४. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करुन, त्या लेखाशिर्षामधून आवश्यक तो खर्च भागविण्यात येईल.

१५. सदर आदेश विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१११५४४२२८४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIKAS TULSHIRAM KADAM

Digitally signed by VIKAS TULSHIRAM KADAM
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=406cb152e109154a7466c0050f88e5a437e17838973824687653a5e8d144b72b, ou=AGRI AND ADF DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIKAS TULSHIRAM KADAM
Date: 2019.09.13 15:24:31 +05'30'

**( विकास तु. कदम )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे- ६७.
३. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, लि. पुणे.
४. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई / नागपूर.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
७. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
८. मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
११. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
१२. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
१३. विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१६. निवड नस्ती (पदुम- ३).